# चार वर्षे आघाडीची : सर्वांगीण प्रगतीची
# १०० महत्वाचे निर्णय

**सर्वांसाठी घरे : २ वर्षात १० लाख घरे**

१) ५ हजार कोटीची तरतूद

२) अनुसुचित जाती व नवबौध्दांसाठी ३०० कोटी रुपये खर्च करुन ४० हजार घरे बांधण्याचा निर्णय.

**म्हाडा वसाहतींना अतिरिक्त चटई निर्देशांक**

३) म्हाडा वसाहतींना अतिरिक्त चटई निर्देशांक देण्याचा निर्णय. त्यामुळे सध्याच्या रहिवासी कुटुंबांना मोठ्या सदनिका देणे शक्य व अतिरिक्त नव्या सदनिका बांधणे शक्य.

४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत राष्ट्रीय गृहनिर्माण योजनेप्रमाणे २७० चौ. फुट कार्पेट क्षेत्र असलेली सदनिका देण्याचा निर्णय (या निर्णयामुळे लाभार्थ्यांना शौचालय व बाथरुमसह ३ खोल्या मिळणे शक्य)

**सामाजिक न्याय**

५) अनुसुचित जातीच्या सर्वांगिण विकासासाठी २००८-०९ या आर्थिक वर्षात २३३२.७९ कोटीची तरतूद. देशात सर्वाधिक.

- सामाजिक आणि आर्थिक मागास घटकातील विद्यार्थ्यांना उच्च व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी बँकेमार्फत एक खिडकी पध्दतीने शैक्षणिक कर्ज मिळवून देण्यासाठी व्यवस्था. या शैक्षणिक कर्जावरील व्याज अनुदान स्वरुपात देण्याचा निर्णय.

**आदिवासी विकास**

६) २००८-०९ या आर्थिक वर्षात आदिवासी उपयोजनेसाठी १,९४१.५० कोटीच्या निधीची तरतूद.

७) आदिवासी विद्यार्थ्यांना सैनिकी शाळांचे शिक्षण देण्यासाठी सध्या आस्तित्वात असलेल्या शिक्षण सैनिकी शाळांना जोडून ३३ अतिरिक्त तुकड्या सुरु करण्याचा निर्णय. यामुळे १,४८५ आदिवासी विद्यार्थ्यांना लाभ.

**अल्पसंख्याकांना दिलासा**

८) अल्पसंख्याकांच्या हितासाठी स्वतंत्र प्रशासकीय विभाग निर्माण करणारे देशातील पहिले राज्य. यंदा १७० कोटी रुपयांची तरतूद.

९) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे भागभांडवल ५० कोटी रुपयां पर्यंत वाढविण्याचा निर्णय.

**उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

१०) खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थांतील अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट, एमबीए, एमसीए या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना १०० टक्के आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय.

**दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना स्वयंरोजगाराची साधने**

११) स्वर्णजयंती, ग्राम स्वयंराजेगार योजनेतंर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध करुन देण्याच्या कार्यक्रमातंर्गत आतापावेतो ८९१ कोटी रुपये खर्च. ३.७४ लक्ष लाभार्थ्यांना लाभ. १ हजार ९९ कोटी रुपयांचा कर्जपुरवठा. यामध्ये ३.०२ लाख महिलांना लाभ देण्यात आला. २००८-०९ या वर्षासाठी ७० कोटी १४ लाख इतक्या निधीची तरतूद.

**आम आदमीला विम्याचा लाभ**

१२) आम आदमी विमा योजनेतंर्गत भूमिहीन कुटुंबातील १८ ते ५९ या वयोगटातील कुटुंब प्रमुखाचा विमा योजनेच्या मुदतीपूर्वी मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास ३० हजार रुपये आणि अपघाती मृत्यू झाल्यास ७५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते.

**अंध - अपंगांना शासकीय जमिनीत प्राधान्य**

१३) अंध व अपंग व्यक्तींना निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक प्रयोजन, विशेष करमणूक केंद्र, संशोधन केंद्र यासाठी प्राधान्याने व सवलतीच्या दराने शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय.

**मानव विकास निर्देशांक वाढविणार**

१४) राज्यातील मानवविकास निर्देशांक कमी असलेल्या १२ जिल्ह्यात मानवविकास मिशनचे कार्य सुरु असून या जिल्ह्यातील काही तालुक्याचा मानव विकास निर्देशांक सुधारण्यास सहाय्य. २००८-२००९ साठी ६५ कोटी रुपयांची तरतूद.

**औद्योगिक विकास**

१५) थेट परकीय गुंतवणुकीत देशात पहिला क्रमांक
१६) ९५ मेगा प्रोजेक्टमध्ये १ लाख ३५ हजार कोटींची गुंतवणूक.
१७) १३६ विशेष आर्थिक प्रकल्प मंजूर. देशात सर्वाधिक. (१ लाख २५ हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित).

**वीज निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य**

१८) गेल्या १० वर्षात प्रथमच अतिरिक्त २ हजार मेगावॅट वीज निर्मिती. (परळी, पारस, भुसावळ येथे नवीन संच कार्यान्वित).
१९) भारनियमन कमी करण्यासाठी गावठान फिडर सेपरेशनचा कार्यक्रम कार्यान्वित. पहिल्या टप्प्यात १५ हजार गावांचा समावेश. दुसऱ्या टप्प्यात १२,६०० गावे घेतली जातील. या कामांवर २१९ कोटी रुपये खर्च.
२०) ऊर्जा क्षेत्रासाठी २००८-०९ या आर्थिक वर्षात १२०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.

**६ टक्के दराने पीक कर्ज**

२१) २००७-०८ या वर्षात शेतकऱ्यांना ६ टक्के या सवलतीच्या दराने पीक कर्ज देण्यासाठी १३० कोटी निधीची तरतूद. (२५ हजार रुपयांपर्यंत अल्प मुदतीचे पीक कर्ज घेऊन वेळेवर परत करणाऱ्या शेतकऱ्यांना ४ टक्के सवलत आणि २५ हजार रुपये ते ३ लक्ष पर्यंत पीक कर्ज घेऊन वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ टक्के व्याज सवलत.

**दूध उत्पादकांना दिलासा**

- गाईच्या दुधाच्या दरात १.१५ प्रती लिटर व म्हशीच्या दुधाच्या दरात २ रुपये प्रती लिटर अशी वाढ.

- पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विदर्भाच्या ६ जिल्ह्यांसाठी दुग्ध व्यवसाय बळकट करण्याचा कार्यक्रम. ७०.२० लक्ष निधी खर्च. १० शितकरण केंद्राची उभारणी. ३० शितकरण केंद्र उभारणीची कार्यवाही प्रगतीपथावर.

**कृषी क्षेत्रातील विकासाचा दर चार टक्के करणार**

२२) हवामान, उपलब्ध तंत्रज्ञान, नैसर्गिक साधनसंपत्ती याचा विचार करुन जिल्हा व राज्यस्तरीय कृषी विकास आराखडे (केंद्राकडून यासाठी १२८ कोटीचा निधी प्राप्त).

२३) सेंद्रिय शेतीला प्राधान्य देण्याचा निर्णय. आतापावेतो १.१४ लक्ष हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आले. यंदा १५ हजार हेक्टरचे उद्दिष्ट. ८ कोटीची तरतूद.

**कापसाच्या संयुक्त शेतीला प्रोत्साहन**

२४) २००६-०७ मध्ये कापसाच्या संयुक्त शेतीअंतर्गत ७,३०४ शेतकऱ्यांच्या १२,५०० हेक्टर क्षेत्रावर कापूस खरेदीचा २५ संस्थांबरोबर करार. या खरीप हंगामात ७१,००० हेक्टर क्षेत्रावर कापसाची संयुक्त शेती - ३२ हजार शेतकरी सामील.

**उस उत्पादक व साखर कारखानदारांना दिलासा**

२५) गाळपाविना शिल्लक ऊसास अनुदान. १३२ कोटीचे अनुदान वाटप.

- साखर घट उतारा अनुदानासाठी १४२ कोटी अनुदान वाटप.
- ५५ सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणीसाठी सहाय्य. १ हजार मेगावॅट वीज निर्मिती. त्यासाठी ग्रामीण भागात ४ हजार कोटीची गुंतवणूक.
- ऊस खरेदी करास माफी.
- ऊस खरेदी कराची बिनव्याजी कर्जात रुपांतर.

२६) **कांदा शेतकऱ्यांना मदत**

- फेब्रुवारी २००७ मध्ये कांद्याच्या अतिरिक्त उत्पादनामुळे भाव कोसळल्याने शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीसाठी प्रती क्विंटल ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय. त्यासाठी २५ कोटी रुपये निधी उपलब्ध.
- जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २००८ मध्ये लेट खरीप हंगामात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढल्याने कांद्याच्या दरात झालेल्या घटीच्या नुकसान

भरपाईसाठी शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ५० रुपये व जास्तीत जास्त २०० रुपये याप्रमाणे अनुदान देण्यात आले.

२७) **फळबागाईतदारांना नुकसान भरपाई**

- २००३-०४ या वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या फळबागांकरिता शेतकऱ्यांच्या मध्यम मुदत कर्जावरील ४० कोटी ९० लाख रुपये व्याजमाफी देण्याचा निर्णय.

२८) **फळांसाठी निर्यात केंद्र**

- मोसंबी, द्राक्षे, डाळिंब, केळी, संत्रे, भाजीपाला यांच्यासाठी निर्यात सुविधा केंद्रे सिंधुदुर्ग, रत्नागिरी, जालना, पुणे, जळगाव, हिंगोली, वर्धा व लातूर या जिल्ह्यात सुरु करणार - ५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित.

२९) **आधुनिक सुविधांनी युक्त टर्मिलन बाजार**

- आधुनिक पणन सुविधा पुरविण्यासाठी मुंबई, नाशिक, नागपूर, औरंगाबाद येथे खाजगीकरणाच्या माध्यमातून टर्मिनल बाजार उभारण्याचा निर्णय.

३०) **राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान**

- २००७-०८ या वर्षापासून राज्यातील ८ जिल्ह्यात गहू, ६ जिल्ह्यात भात व १८ जिल्ह्यात कडधान्य या पिकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान.

३१) **पंतप्रधान पॅकेजची प्रभावी अंमलबजावणी**

- अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान - ८८२१ शेतकरी कुटुंबांना ५,७७० लाख रुपयांचे अनुदान, शिक्षणासाठी २,२१३ शेतकऱ्यांना १२५ लाख रुपयांचे अनुदान, आरोग्यासाठी ६,६०८ शेतकऱ्यांना ४४५ लाख रुपयांचे अनुदान.
- **कर्ज पुनर्गठित** - ९.३७ लक्ष खातेदारांच्या १,४१८ कोटी रुपयांच्या पीक कर्जाचे पुनर्गठण पूर्ण.

- **कर्जवाटप** - २००७-०८ या वर्षात पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट २२२५ कोटी रुपये. ३१ मार्च पर्यंत ५.७५ लक्ष शेतकऱ्यांना १,७३८ कोटीचे कर्ज वाटप.
- २००६ - ०७ मध्ये पीक कर्ज वाटपात ८८० कोटीच्या तुलनेत २०१४ कोटी रुपयांची वाढ. शेतकऱ्यांच्या संख्येत ४.४८ लाखावरुन १०.०७ लाखार्चंत वाढ. व्याज माफी ९.३७ लाख शेतकऱ्यांना १४१८ कोटी थकीत कर्जावरील ८३७ कोटी रुपयांचे व्याज माफ.
- **सिंचन प्रकल्प -** ८ मोठे, ९ मध्यम, ४९२ लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे घेण्यात आली. त्यावर २,१७७ कोटी रुपयांची तरतूद. आतापावेतो १६६९.३४ कोटी खर्च, ४९२ पैकी २३३ लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण. यामुळे ४५,८५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली.

## ३२) राज्य शासनाच्या पॅकेजचे यश

- **कर्ज पुनर्बांधणी -** ४.२० लाख खातेदारांच्या थकीत खात्यात २३९.१२ रक्कम जमा करण्यात आली. व्याज माफ प्रमाणपत्राचे सर्व खातेदारांना वाटप. ९.३७ लाख खातेदारांच्या १४१८ कोटी कर्जाचे पुनर्गठण.
- **सावकारी कर्जाचे नियमन -** अवैध सावकारांकडून घेतलेले ८.१८ कोटी रुपयांचे कर्ज माफ. ५७ शेतकऱ्यांची अवैध सावकारांकडे असलेली ११२.२१ हेक्टर जमीन परत.
- १५५ अवैध सावकारी प्रकरणात विविध पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले.
- **दामदुप्पटीचा निर्णय :** सर्व सहकारी कर्जाला लागू - या अंतर्गत ४८,२२५ कर्जदारांचे ७२.६९ कोटी रुपये व्याज माफ.
- **पतपुरवठा व्यवस्थेचे पुनरुज्जीवन :** २००६-०७ मध्ये २,०१४ कोटी रुपयांचे कर्ज १०.०७ लाख शेतकऱ्यांना वाटप.
- २००७-०८ मध्ये २,२२५ कोटी रुपयांचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असून ३१ मार्च २००८ पर्यंत ५.७५ लक्ष शेतकऱ्यांना १,७३८ कोटीचे कर्ज वाटप.
- **पीक विमा योजनेच्या विमा हप्त्यात सवलत :** २००५-०६ च्या खरीप हंगामात ६८ हजार शेतकऱ्यांना लाभ. २००६-०७ च्या खरीप हंगामात ३.१५ लाख शेतकऱ्यांना लाभ. १२.२४ कोटी रुपये खर्च.

**३३ ) मत्स्य व्यावसायिकांना दिलासा**

- मत्स्य व्यवसाय विकासासाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ४० कोटी निधीची तरतूद.
- मच्छिमार बंदरावर मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी ९२ कामे पूर्ण.
- सागरी किनाऱ्याच्या १८४ मासळी उतरविण्याच्या केंद्रापैकी ५१ ठिकाणी बंदरे व जेटीचा कार्यक्रम. १८ कामे प्रगतीपथावर.
- मासेमारी संकटनिवारण निधी योजनेअंतर्गत मच्छिमारांचा अपघाती मृत्यू अथवा बेपत्ता झाल्यास त्याच्या वारसांना १ लक्ष रुपयांचे अर्थसहाय्य.

**३४) २८ लक्ष कृषी पंपाचे विद्युतीकरण पूर्ण**

- २००८ वर्षात कृषी पपांच्या विद्युतीकरणासाठी ३७२.४२ कोटीची तरतूद.

**सिंचनातून समृध्दी**

३५) यंदाच्या आर्थिक वर्षात ७ हजार कोटींची तरतूद.

३६) सुक्ष्म सिंचन योजनेतंर्गत २००५-०६ सालापासून ६ लक्ष ५१ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणले. २००८-०९ या वर्षात १.३० लक्ष हेक्टर क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याचे नियोजन. त्यासाठी १५ कोटी ६४ लक्षाची तरतूद.

३७) २००७-०८ मध्ये मोठे, मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामामध्ये २ लक्ष हेक्टर सिंचन क्षमतेची निर्मिती. २००८-०९ मध्ये १.५ लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्मितीचे नियोजन. त्यामुळे ६१ अब्ज घनफूट पाणी साठ्याची निर्मिती शक्य.

**३८) पाणलोट विकास**

- पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत ९३ लक्ष हेक्टर क्षेत्रात कामे सुरु. ३५३ तालुक्यात पाणलोट विकासाचा धडक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय.

**प्रत्येक गावात पिण्याचे पाणी**

३९) एकूण ३,०४४ ग्रामपंचायतीमध्ये प्रकल्पांची कामे सुरु. ४,१९९ ग्रामपंचायतींमधील २,२१० वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा सुरु.

४०) ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतंर्गत यंदाच्या आर्थिक वर्षात ४६३.९७ कोटींची तरतूद.

## आरोग्य सुविधांमध्ये वृध्दी

४१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत ४५९.९९ कोटी रुपये खर्च - २०८१ आरोग्य संस्थांची दुरुस्ती. ४४ आरोग्य केंद्रांच्या इमारतींची नवीन बांधकामे घेण्यात आली.

४२) प्रादेशिक अनुशेष कमी करण्याच्या कार्यक्रमातंर्गत ७५ आरोग्य केंद्रे, ८११ उपकेंद्रे, १३ ग्रामीण आरोग्याचा अनुशेष पूर्ण.

४३) आरोग्य केंद्रातील ६,३२३ आणि उपकेंद्रातील ३,०७६ खाटांचा अनुशेष दूर.

४४) २० जिल्हा रुग्णालये व ४ इतर रुग्णालयात टेली मेडिसीनची सोय उपलब्ध.

४५) जीवनदायी योजनेतंर्गत ह्रदयविकास, मुत्रपिंड रोपण, मेंदू व मज्जासंस्थांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहाय्याची मर्यादा ५० हजार रुपये वरुन दीड लाख रुपयेपर्यंत वाढ. जीवनदायी योजनेत कर्करोगाचा समावेश.

४६) १५ ऑगस्ट २००७ पासून डॉक्टर तुमच्या गावी योजना कार्यान्वित. या योजनेतंर्गत २० हजार गावातील ५ हजार रुग्णांना सुविधेचा पुरवठा.

## संपूर्ण स्वच्छता अभियान

४७) केंद्र शासनाच्या निर्मल ग्राम पुरस्कार योजनेत महाराष्ट्राची आघाडी.

४८) गेल्या ३ वर्षात २३६७ ग्रामपंचायतीना निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त.

## रोजगार हमी योजना

४९) १ एप्रिल २००८ पासून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा प्रारंभ.

५०) मजुरीच्या दरात वाढ. आता परिमंडळानुसार किमान ६० व कमाल ६६ रुपये दर.

## नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्यांना दिलासा

५१) एका कुटुंबातील २ किंवा जास्त व्यक्ती मृत झाल्या तरी त्याच्या वारसांना मदत देय नव्हती, ही अट शिथिल करण्यात येऊन सर्व मयत व्यक्तींच्या वारसास मदत देण्याचा निर्णय. ६५ वर्षे आणि यावरील मृत व्यक्तींच्या वारसास मदत देय नव्हती ती शिथिल करण्याचा निर्णय.

५२) बाधित व्यक्तींना प्रती कुटुंब प्रत्येकी १० किलो गहू, तांदूळ, १० लिटर केरोसिन मोफत देण्याचा निर्णय.

५३) अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या मृत जनावरांपैकी केवळ २ मोठ्या जनावरांसाठी देय होती ती मर्यादा शिथिल करुन ५ पर्यंत वाढविण्याचा निर्णय.

५४) २००५ व २००७ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामध्ये बाधित घर मालकास १५०० चौ. फूट व बिगर शेतकरी घर मालकास १००० चौ. फूट मोफत भूखंड. त्यात २५० - ३०० चौ.फुटाचे बांधकाम देण्याचा निर्णय. या बांधकामात राज्य शासनाचा हिस्सा ४० हजार व लाभार्थीचा हिस्सा १० हजार रुपये.

**आपत्ती व्यवस्थापनात देशात आघाडी**

५५) राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्यात देशात आघाडी.

५६) संभाव्य आपत्तीशी समर्थपणे मुकाबला करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अग्निशामक दल, पोलीस दल, गृहरक्षक व नागरी सुरक्षा दलातील ३६ सदस्य असलेल्या शोध व बचाव पथकांची स्थापना.

५७) वीज पडून होणारे मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचा निर्णय. त्यासाठी अभ्यास गटाची स्थापना.

**प्रकल्पग्रस्तांना कर्ज माफी**

५८) प्रकल्पग्रस्तांना वाटप झालेले घर बांधणी कर्ज माफ करण्याचा निर्णय - ३१ मार्च १९९४ पर्यंत प्रकल्पबाधित व्यक्तींना देण्यात आलेल्या कर्जापैकी १० कोटी रुपये मुद्दल व व्याज माफ करण्याचा निर्णय.

- ३१ मार्च १९९४ व त्यानंतर घर बांधण्यासाठी दिलेले कर्ज व त्यावरील व्याज ३३ कोटी रुपये माफ.
- जुन्या प्रकल्पबाधित प्रकल्पग्रस्तांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी २००६-०७ व २००७-०८ या वर्षात प्रत्येकी ८० कोटी रुपये निधीची तरतूद.

**शैक्षणिक गुणवत्ता विकास**

५९) शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या ४३ तालुक्यात ६ वी ते ८ वी पर्यंत शालेय पोषण आहार योजना राबविणार.

६०) राज्यातील ८,६३८ वस्तीशाळांपैकी ३,३८४ वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतर करण्याचा निर्णय.

६१) ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना प्राथमिक शाळेत दाखल करुन गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सर्वांगिण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम कार्यान्वित.

**उच्च व तंत्रशिक्षणचा दर्जा व गुणवत्तेत वाढ**

६२) दिल्लीच्या जवाहरलाल नेहरु विद्यापीठात मराठीचे अध्यासन स्थापन्याचा निर्णय.

६३) मुंबई विद्यापीठात शाहीर अमरशेख यांच्या नावाने अध्यासनाची स्थापना. दीड कोटी रुपये मंजूर.

६४) राष्ट्रीय मूल्यांकन अधिस्वीकृती परिषदेकडून देशात सर्वाधिक ९४५ महाविद्यालये व १९ विद्यापीठांनी मूल्यांकन प्राप्त केले.

६५) टेक्नीकल एज्युकेशन क्वॉलिटी इम्प्रुव्हमेंट प्रोग्रॅम अंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, यूआयसीटी मुंबई, व्हीजेटीआय मुंबई, गुरु गोविंदसिंघ अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेड, अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद, अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली या संस्थांना स्वायत्तता देण्याचा निर्णय.

**न्यायदानाला गती**

६६) न्यायालयामध्ये प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी १५० जलदगती न्यायालये.

६७) दुय्यम न्यायालयांमध्ये मराठीत निर्णय देण्यास प्रारंभ.

६८) न्यायदानाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेनिंग इन्स्टिट्यूट उभारण्याचा निर्णय.

**ग्रंथालयांकडेही लक्ष**

६९) शासनमान्य ग्रंथालयाच्या अनुदानाची रक्कम दुप्पटीने वाढ करण्याचा निर्णय.

७०) १०० वर्षे पूर्ण झालेल्या राज्यातील ७६ ग्रंथांलयांना प्रत्येकी ५ लाख रुपये विशेष अनुदान.

**माहिती व तंत्रज्ञान**

७१) २००८ हे वर्ष ई-गव्हर्नंस म्हणून साजरे करणार

७२) तालुका स्तरापर्यंतची सर्व शासकीय कार्यालये मुख्यालयाशी माहिती तंत्रज्ञान यंत्रणेने जोडणार.

७३) स्टेट डाटा सेंटर आणि ई-डिस्ट्रिक्ट प्रकल्प राबविणार

७४) नागरिकांना ऑनलाईन सेवा देण्यासाठी ऑनलाईन पोर्टर आणि डीजीपी गव्हर्नंससाठी डीजी गव्हर्मेंट प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय.

७५) ग्रामीण भागात ७,२८५ आणि शहरी भागात ९२४ नागरी सेवा केंद्र उभारण्याचा निर्णय. त्याद्वारे २४ तास सेवा उपलब्ध होणार.

**कामगारांच्या पाठीशी**

७६) २०१० पर्यंत बालकामगार पध्दतीचे उच्चाटन करण्यासाठी राज्यस्तरीय कृती आराखडा कार्यान्वित.

७७) इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तीचे नियमन करण्यासाठी राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना.

**मुख्य रस्त्यांचे चौपदरीकरण**

७८) राज्यातील १२ राज्य मार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय. यामधून ६२५ कि.मी. लांबीचे चौपदरीकरण करणे शक्य.

- पुणे - नाशिक - मुंबई हा मार्ग ४ आणि ६ पदरी मार्गाने जोडण्याचा निर्णय.
- वांद्रे - वरळी सागरी मार्गाचा विस्तार नरिमन पॉंईटपर्यंत करण्याचा निर्णय.

**उत्तम कायदा व सुव्यवस्था**

७९) पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी २००७-०८ मध्ये १५७ कोटी रुपये खर्च. २००८-०९ मध्ये १८० कोटी रुपयांची तरतूद.

८०) पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठी ५ वर्षात ५५ हजार पदे भरण्याचा निर्णय.

**तीर्थ क्षेत्रांचा विकास**

८१) फेब्रुवारी २००९ मध्ये तुकाराम महाराज यांच्या जन्मास ४०० वर्षे पूर्ण होत असल्याने देहू, आळंदी, भंडारा डोंगर आणि पंढरपूर या परिसराच्या एकात्मिक विकासासाठी महत्वाकांक्षी प्रकल्पाची योजना.

८२) ग्रामीण भागातील १५७ तीर्थक्षेत्रांच्या विकास कामांसाठी ६७ कोटी ६५ लक्ष निधीची तरतूद. अष्टविनायक मंदिराना भेटी देणाऱ्या भक्तांना मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी १० कोटी रुपयांची तरतूद.

८३) क्रीडा विकासासाठी दरवर्षी १०० कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय.

८४) राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवर अतिउच्च गुणवत्ता सिध्द करणाऱ्या खेळाडुंना शासकीय, निमशासकीय क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय.

**नवीन शेततळी - जुन्या मालगुजारी तलावांची दुरुस्ती**

८५) विदर्भ, मराठवाड्यातील १६ जिल्ह्यात २००७-०८ साली १७,५०० शेततळी बांधण्याचे नियोजन.

८६) गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जिल्ह्यातील माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्यासाठी २० कोटी रुपये मंजूर. त्याद्वारे ६८५ माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्याचे नियोजन. त्याद्वारे ३,८७५ हेक्टर सिंचन क्षेत्राची पुनर्स्थापना.

**आर्थिक परिस्थितीत स्थैर्य**

८७) राज्याच्या आर्थिक परिस्थितीत स्थैर्य. २००६-०७ च्या महसूली आधिक्याप्रमाणे २००७-०८ या वर्षात महसुली आधिक्य राहिले.

८८) शासनाने कर्ज हमीचे चांगले व्यवस्थापन केल्याने २००३-०४ मध्ये असलेली ७०,१२५ कोटी इतकी शासन हमी २००७-०८ मध्ये ३६,८०० कोटी इतकी कमी झाली.

**महसुली जमेत वृध्दी**

८९) महसुली जमेमध्ये २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीत १८.१५ टक्के इतक्या वार्षिक सरासरी वृध्दी दराने वाढ. योजनेत्तर महसुली खर्चावर नियंत्रण. २००६-०७ या वर्षाच्या शेवटी प्रत्यक्षात ८१० कोटी रुपयांचे महसुली आधिक्य झाले.

९०) २००७-०८ या वर्ष अखेरीस २७५९ कोटी रुपये आधिक्य अपेक्षित.

**जिल्हा योजनांसाठी २ हजार कोटी**

९१) जिल्हा योजनांसाठी २००७-०८ या वर्षात १०८० कोटी रुपयांची तरतूद होती. २००८-०९ मध्ये यात दुप्पटीने वाढ करुन ती २ हजार कोटी करण्यात आली आहे. यामुळे लघुसिंचन, पाणीपुरवठा, तंत्रशिक्षण, जलसंधारण ही कामे पूर्ण करण्यासाठी स्थानिक गरजेनुसार आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**नागरी भागांच्या पायाभूत सुविधेचा दर्जा वाढवणार**

९२) नागरी भागाच्या पायाभूत सुविधेचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत सलग दोनदा महाराष्ट्राला सर्वाधिक निधी.

९३) ७५२८ कोटींचे ५१ प्रकल्प मंजूर. केंद्राकडून वितरित अनुदानाच्या १/३ रक्कम महाराष्ट्राला. योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राची देशात आघाडी.

९४) लहान व मध्यम ६१ शहरांचे ८१ प्रकल्प केंद्राकडे पाठवले. २५ प्रकल्पांना केंद्रांकडून १९० कोटी रुपयांचे सहाय्य.

**मुंबईची आंतरराष्ट्रीय महानगर होण्याच्या दिशेने घौडदौड**

९५) मुंबईतील दळणवळण व इतर पायाभूत सुविधांच्या विकासाची ३५ हजार कोटींची कामे सुरु.

९६) मेट्रो रेल्वेच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू. ४५०० कोटीच्या एमयुटीपी टप्पा-२ला (मुंबई अर्बन ट्रांसपोर्ट प्रोजेक्ट फेज- टू) मान्यता. चर्चगेट ते विरार या इलेव्हेटेड रेल्वेमार्गाचा प्रस्ताव मान्य. पुढील १८ महिन्यात १५६ नवीन लोकल गाड्या उपनगरीय स्थानकावर धावतील.

९७) मुंबई मेट्रोपोलिटन रिजन (एमएमआर) मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वांगिण विकासासाठी २ लाख २५ हजार कोटीचा आराखडा मंजूर.

९८) ५० स्काय वॉक बांधले जाणार.

९९) भाडेतत्वावरील ५ लाख घरे ५ वर्षात बांधणार.

**१००) महिला बचत गटांना ४ टक्के व्याज दराने कर्ज.**

---o----